जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2016

तरुण भारत

# आज एम. टेक. इंजिनिअरिंग प्रवेशासंदर्भात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात शैक्षणिक वर्षातील अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर पदवी म्हणजे एम. टेक. इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजीच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अभियांत्रिकी पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा गुरूवार २१ जुलै रोजी तंत्रज्ञान अधिविभागात सकाळी १० वाजता होणार आहे. या कार्यशाळेत ऑनलाईन रजिस्ट्रेशन, ऑप्शन फॉर्म भरणे आदी प्रश्नांबाबत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार आहेत. तसेच विविध एम. टेक. इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी शाखांची माहिती व एम. टेक. मधील करिअरच्या संधी याविषयी माहिती दिली जाणार आहे. तरी विद्यार्थी व पालक यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. जयदिप बागी यांनी केले आहे.

21 JUL 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# अतिरिक्त विद्यार्थ्यांना सोमवारपासून प्रवेश

**पदवी प्रथम वर्ष :** महाविद्यालयांच्या पाहणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

कोल्हापूर : कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या पदवीच्या प्रथम वर्षातील अतिरिक्त विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया सोमवार (दि. २५) पासून सुरु होणार आहे. अतिरिक्त तुकडींना मान्यता देण्यासाठी महाविद्यालयांतील सुविधांच्या पाहणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी दिली.

डॉ. मोरे म्हणाले, पदवी प्रथम वर्षासाठी विविध महाविद्यालयांच्या प्रस्तावानुसार शिवाजी विद्यापीठाकडून मागणी केलेल्या १२७ अतिरिक्त तुकड्यांपैकी १२३ तुकड्यांना शासनाने मान्यता दिली. मात्र, विद्यापीठाने ज्या महाविद्यालयांनी अतिरिक्त तुकडी देण्याबाबत मागणी केली आहे, त्यांना त्यांच्याकडे असलेल्या शैक्षणिक सुविधांची पाहणी करुनच मान्यता देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विद्यापीठाने १२५ पथकांची नियुक्ती केली. या पथकांद्वारे दि. ९ जुलैपासून महाविद्यालयांची पाहणी सुरु झाली. बहुतांश महाविद्यालयांतील पाहणी पूर्ण झाली आहे. पथकांनी पाहणीचा महाविद्यालयनिहाय सादर केलेल्या अहवालानुसार प्रस्तावांची येत्या दोन दिवसांत छाननी केली जाईल. यानंतर महाविद्यालयांना अतिरिक्त तुकडीतील प्रवेशाबाबत मान्यता दिली जाईल. मान्यता मिळालेल्या तुकड्यांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याची कार्यवाही सोमवारपासून सुरु होईल. दरम्यान, महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या सूचनेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने तयारी पूर्ण केली आहे. (प्रतिनिधी)

**विद्यार्थ्यांना दिलासा**

अतिरिक्त तुकडींना शासनासह विद्यापीठाकडून मान्यता मिळाल्यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे पंधरा हजार विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला. गेल्या दीड महिन्यांपासून प्रवेशासाठी धडपडणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत

21 JUL 2016

# कुलसचिव पदाची निवड ऑगस्टमध्ये

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील कुलसचिव पदासाठी २८ अर्ज विद्यापीठ प्रशासनाकडे आले आहेत. अर्जांची छाननी सुरू झाली आहे. अर्जांच्या छाननीनंतर ऑगस्टमध्ये कुलसचिव पदाच्या मुलाखती होणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलसचिव डॉ. डी.व्ही.मुळे यांचा कुलसचिव पदाचा कालावधी संपल्यापासून प्रभारी कुलसचिव म्हणून डॉ. व्ही. एन. शिंदे कार्यरत आहेत. कुलसचिव पदासाठी यापूर्वी जाहिरात निघाली होती. या जाहिरातीनंतर प्राप्त अर्जांच्या छाननी केली. त्यानंतर २१ उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात आले होते. मुलाखतीही झाल्या मात्र निवड समितीने कोणाचीच निवड न करता पुन्हा कुलसचिव पदाची जाहिरात काढण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले आहेत. त्यानुसार कुलसचिव पदासाठी २८ अर्ज आले. या सर्व अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू झाली आहे. तसेच कुलसचिव पदासाठी मुलाखती घेण्यासाठी पाच तज्ज्ञ सदस्यांची समिती नेमली जाणार आहे.

**कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती**